# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत कार्यपत्रिका क्रमांक ११

दिनांक : १०/२/२०१६ वेळ : दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी ची मासिक सभा बुधवार दिनांक १०/२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजतां अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. काळभोर वैशाली जालिंदर – सभापती
२. मा. आर.एस.कुमार
३. मा. भारती फरांदे
४. मा. प्रतिभा भालेराव
५. मा. राजु मिसाळ
६. मा. सुमन नेटके
७. मा. तरस बाळासाहेब
८. मा. प्रसाद शेट्टी
९ . मा. सुजाता टेकवडे
१०. मा. झांबरे सतिश (स्विकृत सदस्य)
११. मा. कुटे गिरीष (स्विकृत सदस्य)

याशिवाय श्री. फारुक शेख, कार्यकारी अभियंता,स्थापत्य, श्री. लियाकत पिरजादे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्री. प्रशांत पाटील, उपअभियंता, पाणीपुरवठा, श्रीमती. मोमीन, उपअभियंता, पाणीपुरवठा, , श्री. शिंदे एच.एस. उपअभियंता, जलनि:स्सारण, श्री. विजय भोजने, उपअभियंता, स्थापत्य-बी.आर.टी.एस., श्री. वैभव पुसाळकर, उपअभियंता, स्थापत्य-उद्यान, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. लवटे सुशिलकुमार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री शितोळे एस.के, कनिष्ठ अभियंता झोनिपु- स्थापत्य श्री. फाटक जे.डी. कनिष्ठ अभियंता, नगररचना , श्रीमती. साळुंके अस्मिता, कनिष्ठ अभियंता स्थापत्य-उद्यान, श्री.बी.एच.डोईफोडे, वाहतुक शाखा, निगडी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ : मा.आर.एस.कुमार यांचा दिनांक १०/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

से. २५ येथील उद्यानाचे " बापू पळसकर उद्यान " असे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २ : मा. बाळासाहेब तरस यांचा दिनांक १०/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील चौकांचे नामकरण करणेबाबत.

ठराव क्रमांक : ५८ विषय क्रमांक : १
दिनांक : १०/२/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास "हस्तीमल शेठ गादिया मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ९/३/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५९ विषय क्रमांक : २
दिनांक : १०/२/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनल " असे

नामकरण करणेबाबत विचार करणे.

(दिनांक ९/३/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्रमांक : ६०** **विषय क्रमांक : ३**

दिनांक : १०/२/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक :मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा. सुमन नेटके

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

(दिनांक ९/३/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

---

**ठराव क्रमांक : ६१** **विषय क्रमांक : ४**

दिनांक : १०/२/२०१६ विभाग :स्थापत्य

सूचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल

बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक ९/३/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

ठराव क्रमांक : ६२ विषय क्रमांक : ५
दिनांक : १०/२/२०१६ विभाग : अ क्षेत्रीय कार्यालय-प्रशासन
सूचक : मा. आर.एस.कुमार अनुमोदक : मा.तरस बाळासाहेब

संदर्भ : अ क्षेत्रीय कार्यालयाचे पत्र क्रमांक अक्षेका/नि/७/कावि/४/२०१६ दिनांक ३/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदरचे अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीचे अवलोकनार्थ ठेवणेबाबत.

सदरचे अंदाजपत्रकाचे अवलोकन होवून सर्वानुमते मान्य करणेत आले.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

**---**

ठराव क्रमांक : ६३ विषय क्रमांक : ६
दिनांक : १०/२/२०१६ विभाग : अ क्षेत्रीय कार्यालय-प्रशासन
सूचक : मा. आर.एस.कुमार अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. आर.एस. कुमार यांचा दिनांक १०/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

से.२५ मध्ये लक्ष्मी कॉलनी मध्ये मनपाचे उद्यान आहे. त्या उद्यानामध्ये राधाकृष्ण मंदिर आहे. या भागात कै. बापू पळसकर राहत होते आणि ते क्रियाशील समाजसेवक होते. या परिसरातील एक जुने-जाणते, लोकप्रिय आणि वृध्द कार्यकर्ते होते. श्री. सखाराम (बापु) पळसकर यांचे जानेवारी २०१६ मध्ये

निधन झाले. त्यांची स्मृती म्हणून वरील उद्यानास “ बापु पळसकर उद्यान ” असे नाव देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ६४ विषय क्रमांक : ७

दिनांक : १०/२/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. बाळासाहेब तरस अनुमोदक : मा. नेटके सुमन

संदर्भ : मा. बाळासाहेब तरस यांचा दिनांक १०/२/२०१६ रोजीचा प्रस्ताव..

प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील – भिमाशंकरनगर येथील टॉवर शेजारील चौकास “ तरस पाटील चौक ” व अंतर्गत चार रस्त्यांना “ भिमाशंकरनगर कॉलनी नं.१ ते ४ ” असे नामकरण करण्यात यावे. व दत्तनगर मधील अंतर्गत चार रस्त्यांना “ दत्तनगर कॉलनी नं. १ ते ४ ” असे नामकरण करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/४१/२०१६
दिनांक : १०/०२/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती